मोठेपणाने वागण्यासाठी अहंकाराला त्याग करावा लागतो

दैनिक

# लोकआरंभ

लोकक्रांतीचा आरंभ




dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १७ जून २०२५ | अंक १८० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# तुझाही संतोष देशमुख करु, बीडमध्ये तरुणावर कोयत्याने वार, प्रकृती चिंताजनक

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. याप्रकरणाची सीआयडी आणि एसआयटीची चौकशी सुरु असून या हत्येच्या कटात सहभागी असलेले विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, जयराम चाटे यांना अटक करण्यात आली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण ताजं असताना बीडमधील मारहाणीच्या घटना काही थांबायचं नाव घेत नाहीत. बीडमधील एका तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. तुझा संतोष





देशमुख करु, असं म्हणत त्याच्यावर कोयत्याने वार करण्यात आले. या घटनेनंतरही अद्यापपर्यंत पोलिसांत गुन्हा दाखल झाला नसून, आरोपी मोकाट आहेत, असा आरोप पीडित तरुणाच्या कुटुंबीयांनी केला आहे. पीडित तरुणाचा भाऊ श्रीहरी सांगुळे यांनी याबद्दल आक्रोश व्यक्त केला आहे. “माझ्या भावाचं बरं-वाईट झालं तर पोलीस प्रशासन जबाबदार राहील” अशी प्रतिक्रिया श्रीहरी सांगुळेंने दिली.आरोपींना अटक नाहीयाप्रकरणी पोलिसांना तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली जात आहे. तसेच आरोपींना अटक करण्याची मागणी केली जात आहे. या मारहाणीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## नेमकं काय घडलं?

बीड जिल्ह्याच्या तांदळवाडी तालुक्यातील भिल्ल येथील एका तरुणाला ‘तुझा आता संतोष देशमुख करू’ अशी धमकी देत जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. कैलास सांगुळे असे हल्ला झालेल्या तरुणाचे नाव आहे. हा तरुण गाडी चालवत असताना भररस्त्यात चौघांनी पाठीमागून कोयत्याने त्याच्या शरीरावर सपासप वार केले. यात त्याच्या डोक्यावर, तोंडावर आणि मानेवर १० हून अधिक वार करण्यात आले. त्यामुळे तो बेशुद्ध पडला. सध्या त्याची प्रकृती चिंताजनक आहे. त्याच्यावर बीडमधील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास सुरु

दरम्यान संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सध्या तपास सुरु आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाला सहा महिने पूर्ण झाले आहे. मात्र तरीही फरार असलेल्या आरोपी कृष्णा आंधळेला अटक करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता संतोष देशमुखांची मुलगी वैभवी देशमुख ही मस्साजोग येथे रस्त्यावर बसून आंदोलन करणार आहे. याबाबतचे निवेदन धनंजय देशमुख यांनी तहसीलदारांना देण्यात आलं आहे.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करुन सातबारा कोरा करणे बाबत- प्रा.अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष रासप

पाटोदा प्रतिनिधी माजी मंत्री महादेवजी जानकर साहेब यांच्या आदेशाने बीड येथे शेतकरी कर्जमाफी संदर्भात तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. शेतकरी हा देशाचा कणा असून, सततच्या नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, व बाजारातील
मंदीमुळे शेतकऱ्याची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झाली आहे.
त्यामुळे त्यांना मोठा दिलासा मिळावा यासाठी ही मागणी करण्यात आली. महाराष्ट्रातील शेतकरी प्रचंड मोठ्या संकटाला सामोरे जात



असताना केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अहवालानुसार शेतकऱ्यापेक्षा शेतमजुराचे उत्पन्न जास्तीचे आहे. शेती करणे नुकसानीचे बनले आहे. अहवालानुसार दिवसाला आठ शेतकऱ्यांची आत्महत्या होत आहे. अशा काळात राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी जाहीर केले होते की, आमचे सरकार आल्यास शेतकऱ्याचा सातबारा कोरा करणार आज हे धाडस दाखवण्याची वेळ आली आहे. आज तहसीलदारसो यांच्यामार्फत आम्ही शासनाला कळवीत आहे. शेतकऱ्याला संपूर्ण कर्जमाफी करत सातबारा कोरा करावा अशी राष्ट्रीय समाज पक्षाच्या माध्यमातून मागणी करीत आहे याची नोंद शासनाने घ्यावी ,अन्यथा लवकरच तीव्र आंदोलन छेडले जाईल. राष्ट्रीय समाज पक्ष नेहमी शेतकऱ्याच्या पाठीशी आहे आणि त्यांचे हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करत राहील यावेळी. प्रा अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष बीड. परशुराम काशीद विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष. शिवाजी चांगण जिल्हा सरचिटणीस. किरण डोळस महिला जिल्हाध्यक्ष. माऊली मार्कड बीड तालुकाध्यक्ष उत्तर. मोहन खेमाडे बीड तालुका उपाध्यक्ष. धोंडीबा उपळकर. अशोक हप्ते. अविनाश काकडे. कृष्णा धापसे. सचिन हातागळे उर्मिला ताई व इतर

# विद्यालयाचा द्वितीय वर्धापन दिन उत्साहात साजरा

बीड शहरातील प्रसिद्ध शिक्षण संस्था संस्कार प्रबोधिनीद्वारा संचालित नामलगाव फाटा येथील संस्कार इंग्लिश हायस्कूल चा दुसरा वर्धापन दिन आज उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मा. अव.कालिदासजी थिगळे, घोसापुरीचे सरपंच फारूक शेख, नामलगाव चे सरपंच विश्वनाथ डोळस, घोसापुरीचे माजी सरपंच रामराव बांड साहेब, संस्थेचे पदाधिकारी बोबडे सर दिलीप खिस्ती सर राजेंद्र प्रसाद सर विद्यालयाच्या प्रिन्सिपल सुजा मॅडम व्हाईस प्रिन्सिपल जॉन सर इत्यादी मंचावर उपस्थित होते. मागील वर्षी सीबीएससी बोर्डाची शाळा म्हणून या विद्यालयाची सुरुवात करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विकास हेच या विद्यालयाचे प्रमुख ध्येय आहे. त्यासाठी येथे निरंतर प्रयत्न केले जातात. आज विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपले कला गुण विविध प्रकारे केले. याप्रसंगी बोलताना थिगळे सरांनी शाळेची व विद्यार्थ्यांच्या विकासाची माहिती दिली. याप्रसंगी बोबडे सरांनी ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठीच ही शाळा स्थापन केली असल्याचे सांगितले. विद्यालयाच्या प्राचार्या सुजा मॅडम



यांनी विद्यालयात होणाऱ्या विविध उपक्रमांची व विद्यार्थ्यांच्या विकासाची माहिती दिली. याप्रसंगी शिक्षक प्रतिनिधी म्हणून कुंदा कुलकर्णी व चलसा मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. इयत्ता सहावी व सातवीचे विद्यार्थी अभय नवले व अनुजा बांड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रसाद कुलकर्णी यांनी यावेळी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाच्या सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष योगदान दिले.

# विद्युत सुरक्षा करी जीवन रक्षा

*बीड दि. १६ :- आपणास माहीतच आहे वीज दिसत नाही. पाणी हे विजेचे चांगले वाहक असल्याने विजेपासून प्रामुख्याने पावसाळ्यात अधिक सतर्कता बाळगणे आवश्यक आहे.
त्यामुळे जीवित व वित्त हानीचा धोका निर्माण होतो. विद्युत सुरक्षेबाबत खालील खबरदारी घेतल्यास विद्युत अपघात टाळता येऊ शकतात. घरात घ्यावयाची खबरदारी इलेक्ट्रिकल स्वाकेट मध्ये धातूच्या वस्तु घालू नये. ओल्या हातांनी किंवा पायांनी विद्युत उपकरण हाताळू नये. योग्य जोडणी नसलेली / तुटलेली वायर किंवा प्लग वापरू नये. भिजलेल्या भागात विद्युत उपकरणे लावू नयेत, लहान मुलांना विद्युत उपकरणांपासून दूर ठेवावे. उपकरणाचा वापर झाल्यावर लगेचच प्लग बंद करून पीन काढून ठेवावी. मोबाइल चार्जिंग सुरू असताना वापर करू नये, एकाच मल्टी पीन स्वाकेट मध्ये अनेक उपकरणे जोडू नये. स्वतः वायरिंग दुरूस्ती करू नये. विद्युत सुरक्षा उपकरणे ELCB / RCCB नेहमी कार्यान्वित ठेवावी. घराबाहेर घ्यावयाची खबरदारी खेळ वाहिनीच्या तारा, विजेचा पोल, ताण तार या पासून लांब खेळावे. घराच्या छतावर, गच्चीवर वावरत असताना वीज वाहिनी जवळून गेलेली असल्यास लोखंडी सळी, ओली काठी त्या जवळ नेवू नये. पाण्यात उभं राहून विद्युत मोटार सुरू करू नये, मोटारच्या वायरला शक्यतो जोड असु नये असल्यास जोडवर योग्य इन्सुलेशन टेपचे आवरण असावे. शेतातील मोटार व स्टार्टर पेटीला योग्य वायरिंग व सक्षम अर्थिंग असावी. वीज चोरी करू नये किंवा अनधिकृत जोडणी करू नये. शेत कुंपणात वीज प्रवाह सोडू नये. तुटलेल्या किंवा लोंबकळलेल्या विद्युत तारा, वायर, झुकलेले पोल या पासून लांब रहावे. वीज वाहिनीच्या तारा खाली थांबू नये, वीज वाहिनी खाली पीक / साहित्य साठवू नये. असे विद्युत निरीक्षण विभाग, विद्युत निरीक्षक सु. भा. चौधरी यांनी कळिवले आहे.
*****

# पेठ बीड पोलीसांची अवैद्य व्हिडिओ गेम जुगार अड्ड्यावर छापा - ४२,७५०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त

बीड, दि. १६ जून २०२५ -पेठ बीड पोलीस ठाण्याच्या पथकाने आज मोमीनपुरा परिसरात अवैद्यपणे सुरू असलेल्या व्हिडिओ गेमच्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत एकूण ४२,७५०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांना खात्रीलायक गुप्त माहिती मिळाली की,
मोमीनपुरा भागात ङ्गगेमिंग गोनफ नावाच्या दुकानामध्ये कमी पैशावर जास्त पैशांचे आमिष दाखवून इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ गेम द्वारे जुगार खेळवला जात आहे.यावरून पोलीस पथक - पोह. १३५३ सुभाष, पोअं. १९६० अल्ताफ, पोअं. २२१० अशपाक,



चालक पोह. १७५८ इम्रान यांच्या सहकार्याने आज दुपारी छापा टाकण्यात आला. छाप्यावेळी आरोपी शेख इम्रान शेख दस्तगीर (वय २८, रा. मोमीनपुरा) हा व्हिडिओ गेम मशीन चालवत असल्याचे आढळून आले. दरम्यान, गेम खेळणारे इतर लोक पोलीसांची चाहूल लागताच घटनास्थळावरून पळून गेले. आरोपीविरुद्ध गु.र.नं. १७१/२०२५, कलम १२(अ), महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कारवाई दरम्यान व्हिडिओ गेम मशीन, इलेक्ट्रॉनिक साहित्य आणि रोख रक्कम असा मिळून ४२,७५०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही संपूर्ण कारवाई मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली.

# गेवराई येथे मतिमंद निवासी विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा

## दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यासह गुलाब पुष्प देवून केले स्वागत




गेवराई : राज्यातील सर्व माध्यमाच्या शाळांमध्ये १६ जून पासून शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला असून त्यानिमित्ताने शहरातील मतिमंद निवासी विद्यालयात प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यासह गुलाब पुष्प देवून प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. यावेळी प्रतिष्ठित नागरिक, पालक वर्ग व शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.रेणुकामाता बहुउद्देशीय सेवाभावी संस्था महांडूळा संचलित मतिमंद निवासी विद्यालय गेवराई , ता.गेवराई जि.बीड येथे सोमवार दि.१६ जुन २०२५ रोजी प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यासह गुलाब पुष्प देवून उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता, त्वरितादेवी व डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सहसचिव शिवाजी ढोबळे, विशेष शिक्षक रविंद्र अरबाड , डॉ.प्रल्हाद बोंदरे ,वस्तीगृह अधिक्षक संदिप खाडे , कार्यालयीन लिपीक विनोद पौळ , श्रीमती भागिरथी उगले, आकाश गिरी , प्रशांत सरोदे , संतोष पुंड , अक्षय दातार , अंकुश लाटे , रमेश गोळेकर , राजेंद्र ढाकणे , विष्णू बर्वे सह पालक वर्ग, शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# नफरवाडीतील चिमुकले शाळेत आले बळीराजाच्या रथातून -जावे आनंदाच्या गावा रव दयावा आनंद आणि आनंदचि घ्यावा

पाटोदा (प्रतिनिधी)तालुक्यातील नफरवाडी गावच्या आय एस ओ मानांकित जि.प.प्रा. शाळेच्या विद्यार्थ्यांचे स्वागत बळीराजाच्या रथातून करण्यात आले.... सकाळी सकाळी झाडावर पाखरांची पिलं आणि रस्त्यावर शाळेची मुलं किलबीलताना पाहुन ४५ दिवस मनाला सुट्टीमुळे आलेली मरगळ क्षणार्धात चैतन्यात रुपांतरीत झाली ...कारण होते ... प्रवेशोत्सव व शाळापूर्वतयारी मेळावा..!!! दि १६/६/२५ रोजी शाळेत ई १ लीत प्रवेशित होणाऱ्या चिमुकल्यांची बैलगाडीतून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली.मिरवणूकीमध्ये, गावचे सरपंच,उपसरपंच,ग्रा.प.सदसब , शा.व्य.समिती अध्यक्ष ,उपाध्यक्ष सर्व सदस्य, शिक्षणप्रेमी नागरीक, शाळेचे माजी विद्यार्थी, तरुण वर्ग
मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीचे स्वागत गावचे सरपंच यांनी तोफा वाजून उत्स्फूर्तपणे केले.मिरवणुकीनंतर शाळेत नवगतांचे



स्वागत गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन करण्यात आले.तदनंतर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुस्तके वाटप आणि गणवेश वाटप करण्यात आले .एरवी शाळेचे नाव काढताच आईच्या पदराआड दडणारं छकुलं आज मात्र विजयी सैनिका सारख डौलात नव्या सवंगड्यांच्या ताफ्यात सहभागी होत होतं . पहिल्याच दिवशी १०० % प्रवेश झाले. अशा प्रकारे प्रवेशोत्सव मोठया थाटामाटात साजरा केला .. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शा.व्य. समितीचे उपाध्यक्ष अशोक वाघ तर प्रमुख पाहुणे म्हणून गावच्या सरपंच विद्याताई बंडू सवासे, अध्यक्ष उत्तरेश्वर औटे,माजी अध्यक्ष भारत ढेरे, शा.व्य.समितीचे सदस्य तथा शिक्षणप्रेमी सेवानिवृत्त मुख्याध्यापक संजय सावंत सर,माजी सरपंच बंडू सवासे, शा.व्य. समिती सदस्य बाळू ढोले, रविकांत वणवे,दगडू मंडलिक,अशोक मंडलिक,अतिष तांबे,परमेश्वर औटे,भारत तळेकर,लक्ष्मण कवडे,ईश्वर तांबे,नानासाहेब तांबे,विष्णू ढेरे,इत्यादी होते. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन श्री.मुरूमकर सर यांनी, प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री खंडागळे सर यांनी तर आभारप्रदर्शन श्री.राऊत सर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.खंडागळे सर,मुरूमकर सर,राऊत सर,काकडे मॅडम,वावरे मॅडम तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

प्रा.शा.नफरवाडी शाळेमध्ये आता बालक कधीही रडत म रडत शाळेत येणार नाही कारण त्यांना पहिल्याच दिवशी आनंद संस्कार करून शाळेत आणले आहे .जि.प.प्रा.शा.नफरवाडी शाळेची पटसंख्या वाढ होत आहे. पाटोदा तालुक्याच्या ठिकाणावरून ग्रामीण भागात असणाऱ्या नफरवाडी शाळेत विद्यार्थी प्रवेशित होत आहेत ही बाब आमच्यासाठी अभिमानास्पद आहे.
अण्णासाहेब खंडागळे
मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा.नफरवाडी

## संपादकीय

### इस्त्रायल-इराणचे युद्ध सुरुच

रविवारी सलग तिसऱ्या दिवशी दोन्ही देशांनी परस्परांवर क्षेपणास्त्रे डागली असून, आतापर्यंत ९१ जण मृत्युमुखी पडले आहेत. इस्त्रायलने इराणच्या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या ठाण्यांवर; तसेच युरेनियम समृद्धीकरणाच्या प्रकल्पांवर हल्ले केले असून, त्यांमध्ये काही लष्करी अधिकारी दगावले आहेत. इस्त्रायलच्या हवाई संरक्षण यंत्रणांना लक्ष्य करून इराणकडून क्षेपणास्त्रांचा मारा होत आहे. दोन्ही बाजू तूर्तास माघार घेण्यास तयार नसल्याने युद्ध लांबणार असे दिसते. या युद्धात सध्या तरी अमेरिका नाही; तसा खुलासाही अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. मात्र, इराण ते मानायला तयार नाही. अमेरिकेच्या मदतीशिवाय इस्त्रायल हल्ले करू शकत नसल्याचा दावा करून इराण अमेरिकेला या युद्धात ओढू पाहत आहे. पश्चिम आशियात अनेक सामरिक ठाणी असल्याने आणि इस्त्रायलच्या बाजूने ठामपणे उभी राहत असल्याने अमेरिका या युद्धात तटस्थ असण्याची शक्यता नाही. इराणने आपल्याविरोधात आगळीक केल्यास त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी ती केव्हाही युद्धात उतरू शकते. ट्रम्प यांनी तसा इशाराही दिला आहे. तसे झाल्यास युद्धाचा भडका वाढू शकतो आणि संपूर्ण पश्चिम आशिया युद्धाने व्यापला जाऊ शकतो. त्याचे परिणाम मात्र केवळ पश्चिम आशियापुरता मर्यादित न राहता जगभर होतील. त्यामुळे इस्त्रायल आणि इराण या दोघांनीही वाटाघाटीद्वारे मार्ग काढण्याची आणि शांतता प्रस्थापित करण्याची गरज आहे. तसे आवाहनही सर्व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून झाले आहे; परंतु सध्या तरी ते हे आवाहन ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत. त्यामुळे जगाला युद्धाच्या परिणामांना सामोरे जाण्याशिवाय तूर्त पर्याय नाही. इस्त्रायल आणि इराण यांच्यातील शत्रुत्व काही आजचे नाही. शीतयुद्धाच्या काळात दोन्ही देशांमधील संबंध सौहार्दाचे होते; परंतु १९७९ मध्ये इराणमध्ये क्रांती झाल्यानंतर तेथील सरकारने इस्त्रायलबाबतची भूमिका बदलली. इस्त्रायल पॅलेस्टिनींचा अधिकार हिरावत असल्याची आणि त्याला कोणतीही वैधानिकता नसल्याची भूमिका घेतली गेली. आपल्या विरोधात गेलेला इराण दहशतवाद्यांना बळ देत असल्याचे इस्त्रायलचे म्हणणे आहे. हिजबुल्ला आणि हमास या दहशतवादी संघटनांना इराणचा पाठिंबा असल्याचा आरोप इस्त्रायलकडून सातत्याने होतो आहे. हुती बंडखोरांचा उपयोगही तो देश करीत असल्याचा त्याचा दावा आहे. त्याचबरोबर इराणचा आण्विक कार्यक्रमही इस्त्रायललक्ष्यी असल्याचा दावा केला जातो. इराणच्या आण्विक कार्यक्रमाला आंतरराष्ट्र ीय संस्थांची मान्यता नाही. मात्र, इस्त्रायल, अमेरिका आणि आंतरराष्ट्रीय दबाव यांना न जुमानता इराणने आपला आण्विक कार्यक्रम सुरू ठेवला आहे. अण्वस्त्र प्रसारबंदीसाठीच्या अटींचे पालन इराणकडून होत नसल्याचे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने अलीकडेच जाहीर केले आहे. इराणच्या अणुकार्यक्रमाच्या अनुषंगाने अमेरिका तेहरानशी वाटाघाटी करीत असून, या चर्चेची सहावी फेरी ओमान येथे रविवारी होणार होती, मात्र, इराणने ती रद्द करण्यात आल्याचे जाहीर केले आहे. कितीही दबाव आला, तरी इराण अणुबॉम्ब मिळविणार आणि तो आपल्या विरोधातच असणार, अशी इस्त्रायलची भावना आहे. तेथील पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी तसे विधानही केले आहे. इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांना ही पार्श्वभूमी आहे. गाझामध्ये तो हमासच्या विरोधात गेल्या अडीच वर्षांपासून लढत असून, आता त्याने इराणवर हल्ले करून दुसरी आघाडी उघडली आहे. या युद्धात अमेरिकेचा प्रवेश झाल्यास, पश्चिम आशियाई देशही युद्धात ओढले जातील. इराक, तसेच आखातात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत. त्या तळांवर इराणचा पाठिंबा असलेल्या दहशतवादी संघटनांकडू न हल्ले होण्याची भीती अमेरिकेला आहे. म्हणूनच ट्रम्प इराणला सातत्याने इशारा देत आहेत. इराणच्या हल्ल्यांत अमेरिकी सामरिक सुविधा लक्ष्य झाल्यास किंवा अमेरिकी नागरिक मारले गेल्यास अमेरिका युद्धात उतरू शकते. मग तीही इराणच्या आण्विक प्रकल्पांवर हल्ले करू शकते. इस्त्रायलच्या लष्करी तळांवर आणि हवाई संरक्षण यंत्रणांवर इराण हल्ले करीत असला, तरी त्यातून अपेक्षित यश न मिळाल्यास तो आखातातील आपल्या शत्रू ंवर हल्ला करू शकतो.२०१९ मध्ये इराणने सौदी अरेबियातील तेल क्षेत्रांवर हल्ले केले होते. तसे आता पुन्हा झाल्यास युद्धाची तीव्रता वाढून त्यामुळे तेल महाग होण्यापासून जगभरातील अर्थव्यवस्था मंदावण्यापर्यंत परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे युद्ध थांबण्याची गरज आहे. शांघाय सहकार्य परिषदेतील याबाबतच्या ठरावावर, इस्त्रायलकडून होत

# इराण-इस्त्रायल संघर्षाचे परिणाम भारतावर

इराण-इस्त्रायल संघर्षाचे परिणाम भारतावर इराण आणि इस्त्रायल यांच्यात सध्या भीषण संघर्ष सुरू आहे आणि त्याची किंमत भारताला मोजावी लागणार आहे. त्याची किंमत न भूतो न भविष्यती अशी आहे. इस्त्रायलने इराणच्या आण्विक स्थळांवर तसेच त्यांच्या युरेनियम समृद्ध तळांवर हल्ले केले आणि त्यामुळे इराणला फार मोठे नुकसान सोसावे लागले. इराणचे लष्करी अधिकारी जे सर्वोच्च आहेत तेही या कारवाईत ठार झाले. इराणने इस्त्रायलवर हल्ले केले, पण त्यांची व्याप्ती इस्त्रायलच्या तुलनेत काहीच नव्हती. परिणामी भारताला आता नव्या पश्चिम आशियातील युद्धबिंदूला सामोरे जावे लागणार आहे. डावपेचात्मक वतुळात इस्त्रायलच्या या चालीचा खूप दिवसांपूर्वीपासून अंदाज व्यक्त केला जात होता. पण आता ती चाल रचली गेली आहे आणि त्याची किंमत इराणला मोजावी लागत आहे. तसेच जगालाही मोजावी लागणार आहे. ही अशी घटना आहे, की जिचे नवी दिल्लीत स्वागत केले जाणार नाही. कारण इस्त्रायल आणि इराण हे दोन्हीही देश भारताचे मित्र देश आहेत. इराणबरोबर तर भारताचे पूर्वापार मैत्री पूर्ण संबंध आहेत, तर इस्त्रायलने भारताला पाकिस्तानसोबत नुकत्याच झालेल्या संघर्षात चांगली साथ दिली आहे. त्यामुळे भारतासमोर असा पेच आहे की कुणाचीही बाजू घेता येत नाही. तरीही भारताला आपले अलिप्तता वादाचे धोरण समोर ठेवून या संघर्षात भूमिका घ्यावी लागणार आहे. इराणचा निर्णायक पराभव झाला अथवा त्याच्या अगदी जवळचे म्हणजे इराण कोसळले तरीही भारतात त्याचे फार मोठे परिणाम होणार आहे. मग भारताला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. भारताने आपली ऊर्जा सुरक्षा उभी केली आहे ती इराणसारख्या मित्र देशांच्या भरवशावर. इराण कोसळला, तर भारताला ऊर्जेचा पुरवठा होणार नाही आणि मग भारताला पुन्हा पूर्ववत पश्चिमी देशांकडे पाहावे लागेल. ते शक्य नाही कारण पश्चिमी देश आज जरी भारताचे मित्र असले तरीही बदलत्या परिस्थितीत भारताची साथ देतीलच असे नाही. सर्वात भयंकर तडाखा भारताला बसेल तो क्रूड ऑईल आयातीवर. सध्या भारताची क्रूड तेलाची आयात इराणद्वारेच होते आणि ती केली जाते होर्मुझच्या बंदरातून. त्या प्रदेशात कुठेही युद्ध सुरू झाले की ती युद्धभूमी होते आणि त्यामुळे भारताच्या क्रूड तेलाच्या किमती १५० प्रति बॅरल इतक्या चढू शकतात. त्यामुळे तेलाच्या किमती वाढल्या की, देशांतर्गत महागाई वाढते आणि व्यापारी असमतोल निर्माण होतो. चलनाचा दबाव वाढतो आणि फिस्कल डेफिसिटमध्ये तीव्र स्वरूपाचा चढ होतो. भारताची अर्थव्यवस्था अगोदरच टाईट मार्जिन्समधून हेलकावे खात आहे. तिला हा मोठा फटका बसेल. तेलाशिवाय भारताची डावपेचात्मक भूराजकीय स्थितीशी तडजोड केली जाईल. इराणचे चाबाहर बंदर जे भारताने विकसित केले आहे आणि ते पाकिस्तानला उत्तर म्हणून काम करत आहे ते या युद्धात एक तर बंद होईल किंवा काम करणे सोडून दिले जाईल आणि त्याबरोबरच भारताकडे असलेला एकमेव उपलब्ध दक्षिण उत्तर मार्ग म्हणजे मध्य आशिया आणि रशिया यांच्याकडे जाण्याचा व्यापारी मार्गही बंद होईल. हे नुकसान प्रचंड असेल. कारण हा मार्ग पाकिस्तान आणि चीनमधून जातो. शिवाय यामुळे काश्मीर आणि त्या पलीकडे दहशतवादाचा धोकाही अतोनात वाढेल. हा सर्व विचार करता भारताने इराण किंवा इस्त्रायल यांपैकी कुणाचीही बाजू न घेताच युद्ध टाळण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. राजनैतिकदृष्ट्याही याचे




तोटे अनेक आहेत. कारण भारताने जर इराणची बाजू घेतली, तर इराणसारखा मित्र देश गमावेल आणि त्याचा फटका भारताला बसेल. कारण इराण हा भारताचा इंटलिजन्स शेअरिंगमध्ये अत्यंत महत्त्वाचा भागीदार आहे. तो लाभ भारताला गमवावा लागेल. या सर्व तोट्याबरोबरच भारताला एक फार मोठ्या शत्रूला तोंड द्यावे लागणार आहे. ते म्हणजे चीनचा या प्रदेशात शिरकाव होईल. चीनच्या इराणीयन डावपेचात्मक ठिकाणांमध्ये प्रवेश केल्याने पाकिस्तानला सहज प्रवेश मिळू शकेल आणि पाकच्या गुप्तचर संस्थांची क्षमता या भारताच्या धोकादायकरीत्या जवळ आहे आणि त्यामुळे भारतासाठी इराणचे कोसळणे हे एखाद्या देशाचे कोसळणे नसेल, तर पाश्चिमात्य प्रदेशाकडे जाणारा रस्ताच बंद होईल. इराण जर या युद्धात पराभूत झाला, तर भारतालाही मोठा फटका बसेल कारण भारताच्या परराष्ट्र धोरणाचा गेली अनेक दशके जे भारताचे परदेशी धोरण ठरवत आहे आणि भारताचा झेंडा उंच ठेवत आहे तेच कोसळेल. इराण-इस्त्रायल यांच्यातील संघर्षाचा तात्कालिक परिणाम म्हणजे भारतातील तेलाच्या किमती ४० ते ५० टक्क्यांनी वाढतील. त्यामुळे भारतातील महागाई एकूणच प्रचंड वाढेल आणि भारताची ८० टक्के गरज ही आयातीतून भागवली जात असल्याने याचा फटका किती प्रमाणात बसेल याचा विचारच न केलेला बरा. सध्याच्या युद्धामुळेच जागतिक तेलाच्या किमती ८ टक्क्यांनी वाढल्या आणि अशी भीती पसरली आहे की हे युद्ध असेच सुरू राहिले, तर महागाई आणखी वाढेल. सध्याच्या इराण-इस्त्रायल संघर्षामुळे अनेक प्रश्न भारतासमोर निर्माण होणार आहेत. जरी भारत इराणकडून थेट पेट्रोल आयात करत नाही तरीही भारताच्या क्र ूड तेलाच्या किमतींचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे कारण जागतिक तेलाच्या किमती आज अर्थव्यवस्था ठरवतात. शिवाय २० टक्के तेल हे होमु ॅझच्या खाडीतून येते. त्यामुळे तेथे युद्ध झाले, तर होर्मुझचा रस्ता बंद होऊन भारताला तेल केप ऑफ गुड होपला वळसा घालून आयात करावे लागेल, त्यामुळे आयात तेलाची किंमत किती वाढेल याची कल्पना येण्यासारखी आहे.या क्षेत्रात व्यत्यय आला, तर त्याचा परिणाम भारताच्या निर्यातीवर होणार आहे. अगोदरच भारताची निर्यात कमी आहे. त्यात हा खर्च वाढला तर भारताची अर्थव्यवस्था बसू शकते. त्यामुळे भारतासमोर सध्या एकच पर्याय आहे

# एक आदर्श व्यक्तिमत्त्व प्रा.सुधाकरराव इंगोले

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : १५-जून १९६३ रोजी बेरळी तालुका मुखेड जिल्हा नांदेड येथील एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मातोश्री जयाबाई वडील तानाजीराव यांच्या पोटी जन्म घेऊन आपलं प्राथमिक शिक्षण बेरळीत तर माध्यमिक शिक्षण मुखेड तर पदव्युत्तर शिक्षण घेऊन केमिस्ट्री विषयात त्यांनी पदवी प्राप्त केली.पुढे हिंगोली येथील आदर्श महाविद्यालयात ते प्राध्यापक म्हणून रुजू झाले.आपल्या केमिस्ट्री विषयात त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले.कालांतराने ते महाविद्यालयाचे उप प्राचार्य झाले त्यांनी सामाजिक क्षेत्रात पण अनेक पदे भूषविले यात




हिंगोली जिल्हा बालकल्याण समितीचे अध्यक्ष मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष आशा अनेक पदावर त्यांनी काम केले.त्यांनी सामाजिक आणि शिक्षण क्षेत्रात आपल्या कुटूंबातून डॉक्टर इंजिनिअर घडविले पत्नी सौ.सलोखा आदर्श गृहिणी धाकटे बंधू किशनराव पॅंथॉलॉजी क्षेत्रात,भावजई सौ.कर्तव्या बेरळी गावच्या पोलीस पाटील जेष्ठ कन्या धैर्या औषध निर्माण अधिकारी चिरंजीव निश्चयअटल ई.ील कला क्षेत्रात करिअर द्रितीय कन्या भारती आयुर्वेदात डॉक्टर पुतण्या सिद्धांत आयुर्वेद क्षेत्रात डॉक्टर पुतणी उत्कर्षा होमिओपॅथी क्षेत्रात डॉक्टर असं हे आदर्श कुटूंब त्यांनी घडवलं. प्रा.सुधाकरराव इंगोले हे आदर्श कुटुंबातील व्यक्तिमत्त्व म्हणजे माझ्या जीवनातील आधारस्तंभच ज्यांनी माझ्या सारख्या सर्व सामान्य कुटुंबातील मुलाला आपली उच्च शिक्षित मुलगी देऊन एक कुटुंब सुधारल कोणताही बडेजाव न करता शिवजन्मोत्सव दिनी १९-फेब्रुवारी २०१४ रोजी शिवविवाह लावून दिला आणि माझ्या अंधारमय जीवनात प्रकाश टाकण्याचा त्यांनी सदैव प्रयत्न केला आशा या व्यक्तिमत्त्वाचा १५-जून रोजी जन्मदिवस मा.उप प्राचार्य सुधाकरराव इंगोले सरांना जन्मदिनाच्या खूप खूप मन:पूर्वक सदिच्छा...

शब्दांकन...
शिवश्री.बालाजी व्यंकटराव पाटील सिरसाट
शिवमती.धैर्या बालाजी पाटील सिरसाट (इंगोले)

# डॉ.सहर्ष घोलप वैद्यकीय मदत कक्षाच्या राज्य कार्यकारणीवर

## आरोग्य क्षेत्रातून केलेल्या जनसेवेच फळ डॉ.सहर्ष घोलप यांना मिळालं!

### आरोग्य क्षेत्रातून गरजूंची मदत करण्याची सुवर्णसंधी : डॉ.सहर्ष घोलप

मी अनेक वर्षापासून आरोग्य क्षेत्रामध्ये काम करत आहे. अनेक गरजवंतांना शासनाच्या योजना व त्यांना योग्य उपचार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असून त्यांना योग्य ते मार्गदर्शनही केले आहे. आता शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची जबाबदारी असल्याने अधिक आरोग्य क्षेत्रामध्ये चांगलं काम करण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. शिवसेना वैद्यकीय पक्षाच्या माध्यमातून प्रधानमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर ट्रस्ट, सर रतन टाटा ट्रस्ट यांच्यासारख्या विविध ट्रस्टच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी थेट बाळासाहेब भवन येथे संपर्क साधून गरजूवंतांना मदत मिळून देता येईल हे माझं भाग्य समजतो..

- डॉ.सहर्ष घोलप
राज्य कार्यकारिणी सदस्य शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष.



जामखेड प्रतिनिधी अनेक वर्षापासून आरोग्य क्षेत्रामध्ये डॉ.सहर्ष घोलप हे काम करत आहेत. अनेक गोरगरीब गरजूवंतांना त्यांच्या माध्यमातून योग्य तो उपचार व मार्गदर्शन मिळून शासनाच्या निधी मिळणे पर्यंत सहकार्य केले आहे. या सर्वांची दखल घेऊन शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष च्या राज्य कार्यकारिणी सदस्य पदी त्यांची निवड करण्यात आली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आज महाराष्ट्रामध्ये गोरगरीब, दिन दुबळ्यांच्या मदतीला धावणारा आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाचं असलेलं एक महत्त्वाचं ठिकाण आहे. इथे गोरगरीब, गरजवंत, आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना हक्काचा उपचार करून मिळतो. त्यांच्या हक्काचा त्यांना मिळाले पाहिजे या हेतून शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली होती. या माध्यमातून अनेक गोरगरीब, गरजूवंत, आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी हे वैद्यकीय मदत कक्ष सुरू करण्यात आले होते. शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या माध्यमातून अनेक गरजूवंतांना त्यांच्या हक्काचा मोबदला योग्य ते उपचार योग्य ती मदत वेळोवेळी मिळवून देण्यात आली आहे. जामखेड येथील डॉ. सहर्ष घोलप यांची शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या राज्य कार्यकारणीवर निवड करण्यात आली आहे. निवड पत्र संस्थापक अध्यक्ष मंगेश नर्सिंग चिवटे यांच्या हस्ते त्यांना देण्यात आले आहे.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार १७ जून २०२५
https://lokaarambh.com


# धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानास जावरला येथे प्रारंभ

## लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वितरण





नांदेड प्रतिनिधी :बालाजी सिरसाटकिनवट :तालुक्यातील जावरला येथे प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानास प्रारंभ झाला. या अभियानाचा शुभारंभ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिह्लाधिकारी जेनीत चन्द्रा दोन्तुला यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांच्या हस्ते शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत बियाणे व इतर विभागाचे विविध प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी त्यांनी शिबिराला उपस्थित असणाऱ्या नागरिकांना मार्गदर्शन केले. या शिबिरास जावरला परिसरातील आदिवासी नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित होते. तसेच सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रदिप नाईक, नायब तहसिलदार रामेश्वर मुंडे, सरपंच नमिता गेडाम, माधवराव मरसकोह्ले व इतर विभागाचे अधिकारी यांची उपस्थिती होती. या शिबिराच्या ठिकाणी महसूल, आरोग्य, कृषी, आदिवासी विकास, बांधकाम, पंचायत समिती तसेच इतर शासकीय विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलच्या माध्यमातून आदिवासी नागरिकांना एकाच ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या.

# जि. प. उ. प्रा. शाळा कोळी बोडखा येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी दिनांक: १६ जून २०२५ जि. प. उ. प्रा. शाळा कोळी बोडखा येथे दि. १६ जून रोजी "प्रवेशोत्सव" मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते आणि घोषणांनी सजवलेली प्रभात फेरी काढली. विशेष म्हणजे या प्रभात फेरीमध्ये गावातील ज्येष्ठ नागरिकांचा सक्रिय सहभाग पाहायला मिळाला, ज्यामुळे उत्सवाला सामूहिकतेची छान जोड मिळाली. या दिवशी शाळेत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात, फुलांचा वर्षाव करून व गोड खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या बालकांसाठी हा दिवस विशेष आनंदाचा ठरला. प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने शाळेच्या व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच गावातील मान्यवर ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने मोफत पाठ्यपुस्तकांचा संच आणि गणवेशाचे वाटप करण्यात आले. ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत आनंददायी वातावरणात पार पडली. सर्वांनी मिळून केलेल्या सहकार्यामुळे प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

# आता एक रुपयात पीकविमा नाही!

## शेतकऱ्यांनी स्वत:चा हिस्सा भरावा लागणार

## फसवणुकीचा धोका वाढला; अधिकृत केंद्रावरूनच अर्ज




सरकारच्या कृषी पीकविमा योजनेत मोठा बदल झाला असून, यापुढे शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीकविमा मिळणार नाही. शेतकऱ्यांना आता विम्याचा काही हिस्सा स्वत:कडून भरावा लागणार आहे. या बदलामुळे विमा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत फसवणुकीचा धोका वाढला आहे, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे. विशेषत: नवीन किंवा अनुभवहीन एजंटांकडून किंवा खाजगी व्यक्तीकडून विमा भरताना अनेक अडचणी उद्भवू शकतात. यामध्ये: ? शेतकऱ्यांच्या पैशांचा अपहार होण्याची शक्यता

? चुकीची माहिती दिल्यास नुकसान भरपाई नाकारली जाऊ शकते

? विमा अर्जच बाद होण्याचा धोका संभवतो

यामुळे शेतकऱ्यांनी विशेष सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. विमा अर्ज भरताना फक्त अधिकृत आणि विश्वासार्ह केंद्रांवरूनच ही प्रक्रिया पार पाडावी, असे आवाहन अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे. विमा अर्ज भरताना ओळखपत्र, 7/12 उतारा, बँक पासबुक, मोबाईल क्रमांक इत्यादी योग्य कागदपत्रांसह अर्ज करणे अत्यावश्यक आहे. चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास नुकसान भरपाई मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. शेतकऱ्यांनी सावध राहावे

# 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' – मंत्री प्रताप सरनाईक राज्य परिवहन महामंडळ विशेष मोहिम राबविणार

-जून 15, 2025मुंबई, दि. १५: शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींसाठी 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही मोहिम राबविण्यात येणार असून आता एसटीचे पास थेट त्यांच्या शाळा-महाविद्यालयात वितरित करण्यात येणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा १६ जूनपासून सुरू होत आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ टक्के इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३.३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते.



यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत पास घ्यावे लागत होते किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनकडून पास घेतले जात असत. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना पाससाठी रांगेत ताटकळावे लागणार नाही. त्यांच्या शाळा – महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून संबंधितांना त्यांचे पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. यामुळे त्यांचा शैक्षणिक वेळ वाया जाणार नाही. एसटी महामंडळाच्या माध्यमातून 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही विशेष मोहीम १६ जूनपासून राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन पासची आवश्यकता असणाऱ्या शाळेतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना होणार असल्याचेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले आहे.

# राज्यात रखडलेल्या मान्सूनचा प्रवास परत सुरु झाला

## विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील कमी पाऊस पडलेल्या भागांमध्ये कोरडवाहू शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा असल्याशिवाय पेरणीची घाई करू नये

मुंबई, दि 16 : 18 दिवसांच्या विश्रांतीनंतर 16 जूनपासून राज्यात मान्सूनचा प्रवास परत सुरु झाला आहे. गेल्या 24 तासात मुंबईसह कोकणात मुसळधार पाऊस पडलेला आहे, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील काही भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला आहे. तुलनेत पूर्व विदर्भातील काही भागातच हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला आहे, आणि उर्वरित विदर्भात हवामान प्रामुख्याने कोरडे होते. 1 जून ते 16 जून दरम्यान कोकण आणि गोवा उपविभागात सरासरीच्या 22 टक्के अधिक पाऊस पडला आहे, तर मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा 1 टक्का कमी, मराठवाड्यात 26 टक्के कमी, आणि



विदर्भात 61 टक्के कमी पाऊस पडला आहे. राज्यातील 134 तालुक्यांमध्ये एकूण पाऊस 65 मिलीमीटर हून अधिक पडला आहे आणि 84 तालुक्यांमध्ये सरासरी ते सरासरीहून अधिक पाऊस पडला आहे. भंडारा, गोंदिया, नागपूर, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, हिंगोली, आणि बीड जिल्ह्यांसह खानदेशातील काही तालुक्यांमध्ये पावसाची घट लक्षणीय आहे. 22 जूनपर्यंत कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरात चांगल्या पावसाची शक्यता आहे, तर मध्य महाराष्ट्र, पश्चिम विदर्भ, आणि मराठवाड्यात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे. दक्षिण मराठवाड्यात पावसाचे प्रमाण कमी राहणार असल्याची शक्यता आहे. या भागांपेक्षा पूर्व विदर्भात पावसाचे प्रमाण थोडे अधिक राहू शकते. या सर्वच भागांमध्ये 22 तारखेपर्यंत मुसळधार किंवा अति मुसळधार पावसाची शक्यता नाही. अद्यापि ज्या भागांमध्ये चांगला पाऊस पडलेला नाही (प्रामुख्याने विदर्भात) त्या भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा असल्याशिवाय पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# कु.भाविका कदम एमबीबीएस साठी पात्र

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : परिक्षम आणि जिद्दीने एका सर्वसामान्य शेतकऱ्याच्या मुलीने NEET परीक्षेत 595 गुण घेऊन वैद्यकीय शिक्षणसाठी पात्र ठरली आहे. तिने हे यश प्राप्त करत कुटूंबाचे व गावाचे नाव उज्वल केले आहे. नांदेड तालुक्यातील पिंपरी (म) येथील रहवाशी असलेल्या श्री.भानुदास संभाजी कदम यांच्या मुलीने गगन भरारी यश प्राप्त केले आहे कु.भाविका रूखमीनबाई भानुदास कदम हिने NEET 2025 परिक्षेमध्ये 595 गुण घेऊन उल्लेखनिय यश प्राप्त केले आहे.कु.भाविका कदम हिने अत्यंत कठिण आर्थिक परिस्थीतीतुन अभ्यास करत हे यश मिळवले.आई वडील शेती करून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवतात. आमच्या मुलीने दिवस रात्र मेहनत घेऊन डॉक्टर होण्याचे स्वप्न पुर्ण केले. आमच्या कष्टाच चीज झालं आशा भावना भाविकाच्या आई वडिलांनी व्यक्त केल्या. तर माझ्या यशामागे आई वडील शिक्षक असल्याचे भाविका म्हणते.तिच्या यशामुळे



संपूर्ण गावात कुटुंबात आनंदाचे वातावरण असून संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्त कमलेश भगवानराव कदम यांनी भाविकाचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी सुभेच्या दिल्या. यावेळी एकनाथराव कदम ,काशिनाथ कदम दत्ता कदम ,विलास कदम, सचिन कदम ,अविनाश जोगदंड ,विशाल कदम हनुमान जोगदंड ,नंदकुमार जोगदंड ,बंटी कदम, जनार्दन कदम, रतन जोगदंड,स्वप्नील जोगदंड ,माधव कदम, गुलाब कदम दशरथ कदम, बालु गोरखं, मुंजाजी कदम यांच्यासह ग्रामस्थांनी तिच्या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे.

# स्वच्छता तेथे आरोग्याची धनसंपदा : राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : स्वच्छतेतून आरोग्य, आरोग्यातून समृध्दी असा संदेश संत गाडगेबाबा यांनी दिला आहे. जिथे स्वच्छता असते तिथे सुख-शांती असते. ज्या घरात स्वच्छता असते तेथे आरोग्याची धनसंपदा असते. म्हणून स्वच्छतेला महत्त्व असून ते प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचविणे गरजेचे असल्याचे मत राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर ह्या माहूर येथे दर्शनाच्या व आनंद दत्तधाम आश्रमभेटीच्या निमित्ताने नियोजित दौऱ्यावर आल्या होत्या. यावेळी त्यांनी प्रथम माहूर गडावरील भगवान दत्त प्रभू, माता रेणुकेचे दर्शन घेऊन आरती केली. त्यानंतर साईनाथ महाराज वसमतकर यांच्या आनंद दत्तधाम आश्रमास भेट देऊन आशीर्वाद घेतले. यावेळी आश्रमाच्यावतीने त्यांचा यथोचित सत्कार सन्मान करण्यात आला. यावेळी भक्तांना संबोधित करताना राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, मुघलांनी उध्वस्त केलेल्या मंदिराची उभारणी करण्याचे काम 300 वर्षापूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी केले. त्यांच्याच विचाराचा वारसा पुढे नेत

छायाचित्र : बालाजी कोंडे



देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रभू रामचंद्राचे मंदिर अयोध्येत उभा केले. काशी कॉरिडॉर उभारले, उज्जैन मंदिराचा विकास केला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी ही तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा म्हणून भरभरून निधीची घोषणा केली आहे. त्यात श्रीक्षेत्र माहुरचा देखील समावेश आहे. प्रत्येक तीर्थक्षेत्र दर्जेदार व्हायला पाहिजे त्या ठिकाणावरून आपणास ऊर्जा मिळते त्यासाठी आमचे राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. साईनाथ महाराज वसमतकर यांनी माहूर या संत भूमीचे महत्व सांगून राज्य सरकारचा स्वच्छता दूत म्हणून शेवट पर्यंत देशसेवा करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी खासदार नागेश पाटील आष्टीकर, शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी, भाजपचे तालुकाध्यक्ष निळखंट मस्के, संध्या प्रफुल राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. सुत्रसंचालन एस. एस. पाटील यांनी तर आभार भाऊ पाटील यांनी मानले.

# इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षकांना सेवानियम लागू करावेत - मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

जालना (दि १५जून): राज्यातील इंग्रजी म ाध्यमांच्या शाळेतील प्रशिक्षित शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य लाभण्यासाठी सेवानियम लागू करावेत अशी म ागणी मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष.श्री रमेश आंधळे व जिल्हा सचिव.श्री संजय येळवंते. यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, राज्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. याशाळेवर हजारो शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. या शिक्षकांच्या सेवेला ना संरक्षण आहे ना यथास्थिती वेतन आहे. त्यामुळे या शाळेत कार्यरत शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव आहे. आर्थिक विवंचनेत असलेला उपाशी पोटी आणि सेवासुरक्षा नसल्याने असुरक्षिततेची भावना असलेला शिक्षक ही या राज्याची शोकांतिका आहे. या शाळेवर कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांम धे असंतोष निर्माण होत आहे. मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे व व्ही.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांच्या नेतृत्वाखाली यासाठी प्रचंड आंदोलन उभारण्यात येणार आहे.दर्जेदार शिक्षणासाठी राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षकांना सेवासंरक्षण व प्रचलित नियम व कायद्यानुसार वेतन देण्यात यावे आणि संघर्ष व अप्रिय घटना टाळाव्यात अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे व जिल्हा सचिव श्री संजय येळवंते यांच्यासह केंद्रीय जिल्हा मार्गदर्शक प्रा.डॉ.मारोती तेगमपुरे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, केंद्रीय कार्यकारीणी सदस्य प्रेमदास राठोड,आरेफ कुरेशी,उपाध्यक्ष जगन वाघमोडे, भीमाशंकर शिंदे, कार्याध्यक्ष फरकूंद अली सय्यद, कोषाध्यक्ष नारायण मुंडे,प्रद्युम्न काकड, हकीम पटेल, भगवान धनगे, गणेश चव्हाण, तुकाराम पडघन, संजय चव्हाण, गणेश मेहेत्रे, राधेश्याम चौधरी, शिवहरी कांयदे, विजयकुमार खरात, आनंद वाघ, जनार्दन कुदर, सुधाकर डोईफोडे, बबन लंके यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# G7 परिषद सोडून ट्रम्प लवकर परतणार, तेहरान रिकामे करा, इराणला इशारा, मोठा हल्ला होणार?

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कॅनडा दौऱ्यावर आहे. कॅनड्यात होणाऱ्या जी 7 परिषदेत ते सहभागी होणार आहे. परंतु नियोजित दौरा पूर्ण न करता ते लवकर परतणार आहे. इराण-इस्रायल संघर्षामुळे ट्रम्प अमेरिकेत परतणार आहे. व्हाईट हाऊसचे प्रेस सचिव कॅरोलिन लेविट यांनी सोशल मीडिया पोस्टवर यासंदर्भात माहिती दिली. G7 शिखर परिषदेसाठी कॅनडाला रवाना होण्यापूर्वी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी मोठे विधान केले आहे. ट्रम्प यांच्या या विधानामुळे इराणमध्ये खळबळ उडाली आहे. इस्रायल आणि इराणकडून एकमेकांवर सुरू असलेल्या हल्ल्यांदरम्यान, ट्रम्प यांनी एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, मी इराणला अणू करारावर स्वाक्षरी करायला सांगितली होती. त्यावर इराणने स्वाक्षरी करायला हवी होती. इराणकडे अण्वस्त्र असणार नाही, हे मी वारंवार सांगितले आहे. आता प्रत्येकाने ताबडतोब तेहरान सोडले पाहिजे. ट्रम्प यांच्या या इशाऱ्यानंतर इराणवर मोठा हल्ला होणार की काय? अशी



शक्यता व्यक्त होत आहे. इस्रायलने आधीच तेहरानमध्ये अनेक मोठे हल्ले केले आहेत, ज्यात लष्करी तळ तसेच नागरी इमारतींना लक्ष्य करण्यात आले आहे. इस्रायलकडून होणाऱ्या हल्ल्यांमुळे लोक तेहरान सोडून जात आहे. त्यामुळे रविवारी तेहरानमधील रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाली होती. आता ट्रम्प यांच्या विधानानंतर हे स्थलांतर आणखी वाढले आहे. सीबीएसच्या वृत्तानुसार, अमेरिकन अधिकाऱ्यांनी म्हटले आहे की, इराणवरील इस्रायली हल्ल्यात त्यांचा सहभाग नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्रीय सुरक्षा परिषदेला बैठक बोलावण्याचे निर्देश दिले असले तरी, याचा अर्थ असा नाही की वॉशिंग्टन हल्ल्यांमध्ये सहभागी असणार आहे. इस्रायलने इराणच्या अणु केंद्र आणि लष्करी तळांवर शुक्रवार १३ जून रोजी हल्ले केले होते. त्यानंतर इराणकडूनही पलटवार करण्यात आला. आता दोन्ही देश एकमेकांवर हल्ले करत आहेत. युद्धाच्या पाचव्या दिवसापर्यंत सुमारे ३० इराणी लष्करी अधिकारी आणि शास्त्रज्ञांसह सुमारे २३० लोक मृत्यू झाला आहे. तसेच १२०० हून अधिक जखमी झाले आहेत. इराणमधील अनेक रुग्णालय भरली

## चला शाळेला - सुट्या संपल्या : जिल्ह्यात उत्साहात गावोगावी शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत
## १०० शाळात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने प्रवेशोत्सव सोहळा संपन्न

प्रतिनिधी बीड वांगी येथे सोमवार दि १६ जून रोजी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात जि. प. कें. प्रा. शाळा , वांगी येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आली . या प्रसंगी विदयार्थ्यांना पुष्पगुच्छ , पुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशाने आज जिल्हाभरात विविध विभागाचे अधिकारी सकाळीच विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी पोहोचले . विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी , पहिल्या दिवसापासूनच हजेरी वाढावी आणि एकंदरीतच शैक्षणिक वातावरण निर्मिती व्हावी हा या मागचा उद्देश आहे . अपर



जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व स्वतः जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन विविध शाळांमध्ये उपस्थित होते .वांगी येथे शाळेत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी १०० टक्के विद्यार्थ्यांची पटनोंदणी व्हावी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या इयत्ता १ ली च्या पटात लक्षणीय वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत , गावातील अंगणवाडी व बालवाडी यांना शिक्षकांनी भेट देऊन त्यातील इयत्ता पहिलीमध्ये दाखल पात्र विद्यार्थी यादी घ्यावी व त्यांचा प्रवेश करून घ्यावा , जिल्हा परिषद शाळांमधील सोयी सुविधा , शिष्यवृत्ती , विविध उपक्रम याबाबत पालकांना माहिती द्यावी अशा सूचना शिक्षकांना दिल्या . त्यांनी विदयार्थ्यांशी संवाद साधताना त्यांना जीवनात असलेले शिक्षणाचे महत्व पटवून दिले . शाळेतील विदयार्थ्यांची संख्या वाढण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले . पुढे बोलताना त्यांनी विदयार्थ्यांचा शिक्षणाबरोबरच कला , क्रीडा , आरोग्य असा सर्वांगीण विकास व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली . शिक्षकांबरोबरच गावातील इतर उच्चशिक्षित नागरिकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा , सामान्य ज्ञान याबाबत मार्गदर्शन करावे तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांचे महत्व सांगून वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले . तहसीलदार शेळके यांनी फार्मर आयडी , जिवंत ७/१२ मोहीम , विविध शासकीय योजना , संजय गांधी निराधार योजना ,श्रावण बाळ योजना , ग्रामस्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले . तसेच त्यांनी गावागावात विविध शिबिरे घेऊन गावातच लोकांना त्यांची कामे पूर्ण करून द्यावी , असे आवाहन केले . शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करणे बाबत मार्गदर्शन केले . तसेच शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले . शेतकऱ्यांचे प्रश्न गाव पातळीवरच मिटवून त्यांना न्याय देण्यात यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले .

## नागरिकाच्या आरोग्यापेक्षा मुख्यमंत्र्याचा दौरा महत्त्वाचा आहे का?:-शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) बीड शहरातील काही भागात जाणून-बजून नाल्या काढण्यात येत नाही. आणि जर नाल्या काढले गेले तरी पंधरा-वीस दिवस ते भरून नेत नाही.ही परिस्थिती तेलगाव नाका पटेल नगर भागात होत आहे. मुकादम स्वच्छता निरीक्षक यांच्याशी संपर्क साधला असता त्यांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्री साहेब २० तारखेला बीड दौऱ्यावर येत असून तिकडे काम चालू आहे. २० तारखे नंतर नाल्या काढून घेऊ. पण सध्या परिस्थिती अशी झालेली आहे की,पावसाच्या पाण्यामुळे काढलेली घाण रस्त्यावर व परत नाल्यात गेलेली आहे व त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत आहे.एकीकडे मस्वच्छ बीड म सुंदर बीड म या मोहिमांतर्गत



बीड नगरपालिका च्या मुख्याधिकारी नीताताई अंधारे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात नालेसफाई काम सुरू आहे. मात्र काही कर्मचारी आणि मुकादमच नाही तर स्वच्छता निरीक्षक हे सुद्धा ऐकायला तयार नाही. दुर्गंधीमुळे मच्छराचा प्रादुर्भाव वाढत आहे. नागरिकाचे आरोग्य धोक्यात आले असून,श्वास घेणे ही मुश्किल झाले आहे .

माझी व नागरिकाचे मा. मुख्याधिकारी नीताताई अंधारे मॅडम यांना विनंती आहे की, त्यांनी लक्ष द्यावे.तसेच संबंधी निष्काळजी कर्मचाऱ्यावर योग्य ती कारवाई करावी. अशी जोरदार चर्चा नागरिकांतून होत आहे.

## मोसमी वाऱ्यांची आगेकूच

मागील अनेक दिवसांपासून प्रवास मंदावलेल्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी सोमवारी अखेर आगेकूच केली. संपूर्ण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा मोसमी पावसाने व्यापला आहे. तर, विदर्भातील बहुतांश भाग मोसमी पावसाने व्यापला. दरम्यान, मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय झाल्यामुळे संपूर्ण राज्यात जोरदार पाऊस कोसळत आहे. यंदा मोसमी पाऊस लवकर म्हणजेच २४ मे रोजी केरळमध्ये दाखल झाला. अरबी समुद्र, बंगालच्या उपसागरातही मोसमी वाऱ्यांनी आगेकूच केली. केरळच्या बहुतेक भागासह उत्तर कर्नाटकातील कारवारपर्यंत मोसमी वारे धडकले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी २५ मे रोजी मोसमी पावसाचे राज्यात म्हणजेच, देवगड तसेच कर्नाटक आणि संपूर्ण गोव्यात आगमन झाले. लगेचच दुसऱ्या दिवशी मोसमी पाऊस मुंबईत दाखल झाला. मात्र २६ मेनंतर मोसमी वाऱ्यांचा प्रवास मंदावला होता. मुंबई, अहिल्यानगर, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील काही भागात दाखल झाल्यानंतर नैऋत्य मोसमी वाऱ्यांची वाटचाल मंदावली होती. मोसमी पावसाच्या वाटचालीसाठी पोषक वातावरण नव्हती. त्यानंतर साधारण २० दिवसांनी म्हणजेच सोमवारी मोसमी वाऱ्यांनी आगेकूच केली.

## ऑनलाइन घरकुलासाठी कोणालाही पैसे देऊ नये नवनाथ अण्णा शिराळे पाटील.

बीड प्रतिनिधी. सध्या घरकुल ऑनलाईन करण्याची प्रक्रिया १८ तारीख असल्याचे समजते तरी काही दलाल गोरगरीब लोकांना अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून लोकांच्या खिशावर अधिकाऱ्याच्या संगणमताने डल्ला मारण्याचे काम करत असल्याचे सध्या दिसत आहे तरी अशा दलालखोर लोकांना कोणीही पैसे देऊ नयेत ऑनलाईन प्रक्रिया ही स्वतः सेल्फ आपल्या मोबाईल वरती करण्यासाठी मोदी सरकारने लोकांच्या हितासाठी ही योजना केलेली आहे एका मोबाईल वरती एकच घरकुल ऑनलाईन करता येते या घरकुल योजनेच्या वेबसाईटवर जाऊन त्या ठिकाणी आपले आधार लिंक नंबर टाकून नाव नोंदणी करण्यात यावी याच्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याला व त्याच्या दलाला कोणत्याही नागरिकांनी पैसे देऊ नयेत जर कोणी पैसे मागण्याचा प्रयत्न करत असेल तर डायरेक्ट आमच्याशी संपर्क साधावा किंवा पोलीस प्रशासनाचे अँटीकरप्शन पोलीस यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन बीड नगर



परिषदेचे माजी सभापती तथा भाजपा नेते नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे बीड जिल्ह्यामध्ये नगर प्रशासन ग्रामपंचायत पंचायत समिती यांच्या माध्यमातून ही योजना केंद्र सरकार राबवत आहे पण काही कर्मचारी दलाला पुढे करून आपला खिसा चिरीमिरीने भरण्याचा प्रयत्न सध्या करत असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे याला आळा घालण्यासाठी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी एक पत्रक जारी केले आहे त्या पत्रकामध्ये त्यांनी स्वतः चा नंबर दिलेला आहे नंबर आहे ९८ २२ ८७५ ९४५ कोणी जर चिरीमिरी मागात असेल तर या नंबर वरती संपर्क करावा किंवा पोलीस प्रशासनाशी संपर्क करावा लेखी तक्रारीने करावा पैसे कोणालाही पैसे देण्यात येऊ नये ही मा श्री पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांची योजना आहे असे प्रसिद्धी पत्रकार द्वारे नवनाथ शिराळे पाटील पाटील व माजी नगरसेवक बाबुराव परळकर यांनी कळवले आहे .

# जिल्हा परिषद कारेगव्हाण शाळेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची उपस्थिती
# पहिलं पाऊल : स्कुल चले हम बालविवाहमुक्तीची शपथ व वृक्षारोपण

बीड - बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगव्हाण येथे प्रवेशोत्सव २०२५ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, *श्रशिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, जिल्हा समन्वयक संजय मरे, सरपंच व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत* करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करण्यात आला. कार्यक्रमात



विद्यार्थ्यांचा उत्साह व पालकांचा सहभाग उल्लेखनीय होता.या वेळी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी गेल्या दोन वर्षांपासून कारेगव्हाण येथे एकही बालविवाह न झाल्याचे कौतुक करत, *बीड जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठीफ शपथ दिली. त्यांनी शिक्षणात सातत्य ठेवण्याचे आवाहन करत गावकऱ्यांच्या सहकार्याची प्रशंसा केली. शेवटी शाळेच्या प्रांगणात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या



हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी स्वगत केले मुख्याध्यापक विकास परदेशी, सहशिक्षक जोगदंड, आणि सहकाऱ्यांनी केले होते. गावात शिक्षण, बालविवाहमुक्ती आणि पर्यावरण यावर सजगतेचा संदेश गेला असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com